## नियमीत दिवाणी मुकदमा नं. २८/२०१८ मधील निशाण नं. ३३ वरील आदेश

### वादीची वादकथने थोडक्यात खालील प्रमाणे.

या दाव्यात निशाण ५ येथे दिलेल्या तुर्तातुर्त ताकिद अर्जावर न्यायालयाने एकतर्फा आदेश देऊन प्रतिवादी क्र. १ ते ५ यांना दावा मिळकतीमधील रस्त्यावर स्वत: अगर कोणाही मार्फत गडगा घालू नये अगर कोणत्याही प्रकारचा अडथळा करु नये. तसेच वादी याला व्यवसाय करण्यास, वाहनांची ये—जा करण्यास अडथळा करु नये असा एकतर्फा तुर्तातुर्त आदेश करण्यात आला होता. सदर आदेश झाले नंतर प्रतिवादी क्र. १ ते ५ यांना त्या आदेशाची समज पोष्टामार्फत व बेलिफा मार्फत दिली होती. असे असताना देखील, दिनांक ८/५/२०१८ रोजी सकाळी १०. ३० वाजणेच्या सुमारास वादीचे वडिल अरुण मुकुंद सामंत हे दावा अ.क्र. १च्या मिळकतीकडे जे.सी.बी. घेवून जात असताना प्रतिवादीतर्फे एक इसम विष्णु काशीराम तुळसकर याने वादीच्या वडिलांना “कोर्टाचा आदेश आम्ही मानत नाही” असे सांगुन वादीचा मार्ग अडविला. जे.सी.बी. च्या दोन्ही बाजुला रस्त्यावर दगड लावून रस्ता बंद केला. तसेच वादीच्या वडिलांनी सदरचा जे.सी.बी. मागे घेतल्यानंतर त्याठिकाणी विष्णु काशीराम तुळसकर याने उर्वरीत ठिकाणी दगड ठेवून रस्ता बंद केला. सदर विष्णु तुळसकर याच्या गैरकृत्यास प्रतिवादी क्र. १ ते ५ यांची फुस आहे. त्या संदर्भात वादी हा दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ३९ (२) अन्वये अवमान याचिका दाखल करणार आहे. सबब विष्णु काशिराम तुळसकर याने रस्त्यावर दगड लावून वाहनांची ये—जा करण्यापासून अडथळा होण्यासाठी रस्ता बंद केलेला आहे. दावा मिळकतीमध्ये पावसाळयापूर्वी वादीला काही आवश्यक ती कामे करायची आहेत. सबब सदर केलेला अडथळा बेलीफामार्फत काढून मिळावा आणि त्या कामी पोलीस संरक्षण देखील मिळावे अशी मागणी वादीने केलेली आहे.

### प्रतिवादींचे वादकथन थोडक्यात खालीलप्रमाणे—

२. या अर्जास प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी निशाण ४१ येथे आपले म्हणणे मांडलेले असून त्यांनी वादीच्या अर्जाचे खंडण केलेले आहे. त्यांच्या मते दिनांक २४/५/२०१८ रोजी प्रतिवादी यांचे वकिल तारीख घेवून गेल्यानंतर मागाहून प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यात आला आहे. सदर म्हणण्याव्दारे त्यांनी तुर्तास प्रस्तुत अर्जावरती

प्रतिवादी क्र. १ ते ५ यांचे मार्फत म्हणणे मांडण्यात आलेले असुन सविस्तर म्हणणे देण्याची तजविज राखून ठेवली असल्याचे नमुद केले आहे. मात्र निशाण ३३ च्या अर्जास प्रतिवादी क्र. १ ते ५ यांचे मार्फत सविस्तर म्हणणे देण्यात आलेले नाही. या अर्जावर आता युक्तीवाद देखील करण्यात आलेला आहे.

३. अशा परिस्थितीत त्यांच्या म्हणण्याचे अवलोकन केले असता पुढे असे दिसते की त्यांनी वादीच्या अर्जाचे खंडण केलेले आहे. त्यांनी ही गोष्ट नाकारली आहे की विष्णु काशिराम तुळसकर याला प्रतिवादींची फुस आहे. प्रतिवादीवर वादीने आरोप केल्याप्रमाणे त्यांनी कोणतेही कृत्य केलेले नाही. त्यांनी पुढे असे नमुद केलेले आहे की दावा मिळकतीमधील सर्व्हे नं. ४१, हिस्सा नं. १ यामध्ये प्रतिवादी १ ते ५ आणि इतर अनेक भागधारक आहेत. सदर मिळकतीकडे वादीचा कोणताही संबंध नाही, असे असताना वादी व त्याचे वडिल त्यामधुन मोठा रस्ता तयार करु पहात आहेत. त्या मिळकतीमध्ये कधीही रस्ता अस्तित्वात नव्हता व नाही. सबब अस्तित्वात नसलेला रस्ता वादी हे प्रस्थापित करु पहात आहे. वादी याला जर का खरोखरच अडथळा निर्माण झाला असेल तर त्यांना संबंधीत इसमाकडून दाद मागणे आवश्यक आहे. त्रयस्थ व्यक्तीने गैरकृत्य केले असे भासवून त्याचे खापर निष्कारण प्रतिवादी क्र. १ ते ५ यांचे वर फोडले जात आहे. सदरची बाब चुकीची आहे. त्यांच्या मते वादी याने त्याच्या दावा मिळकतीमध्ये असे सांगितले आहे की प्रतिवादी व्यतिरिक्त इतर सहभागधारक यांची वादी यांना कोणतीही हरकत नाही. मात्र प्रस्तुत अर्जामध्ये नमुद करण्यात आलेला विष्णु काशिराम तुळसकर हा इसम दावा मिळकत परिशिष्ट ‘ब’ मधील एक सहभागधारक आहे. मात्र त्याचे विरुध्द दाद मागायची सोडून वादी हा प्रतिवादी क्र. १ ते ५ यांचे विरुध्द दाद मागत आहे.

४. दिनांक ३/५/२०१८ रोजी वादी याने तुर्तातुर्त ताकिद मिळाल्यावर दावा मिळकतीमधुन रस्ता नसल्यामुळे तो रस्ता आहे असे भासविण्यासाठी वादी याचे वडिलांनी दिनांक ८/५/२०१८ रोजी जे.सी.बी. यंत्र घेवून दावा मिळकतीमध्ये अनाधिकारे प्रवेश करण्याच्या हेतुने आले तेव्हा प्रतिवादीचे इतर सहभागधारापैकी विष्णु काशिराम तुळसकर यांली त्यांना अडविले. न्यायालयाचा आदेश विष्णु काशिराम

तुळसकर याचे विरुध्द असल्याची खोटी बतावणी वादी याने केली व विष्णु काशिराम तुळसकर याला रस्ता अडविता येणार नाही असे सांगितले. मात्र त्यास असा कोणताही आदेश दाखविला नाही. या उलट, वादी याने विष्णु काशिराम तुळसकर व बाळकृष्ण विष्णु तुळसकर यांच्याविरुध्द निवती पोलिस ठाण्याला फिर्याद दाखल केलेली आहे. निवती पोलीस हे बाळकृष्ण विष्णु तुळसकर व विष्णु काशिराम तुळसकर यांना निवती पोलीस ठाण्याला घेवून गेले व १० वाजेपर्यंत बसवून ठेवले. दावा मिळकतीमध्ये कोणताही रस्ता नसुन वादी व त्याचे वडिल अरेरावीच्या जोरावर त्यामधुन रस्ता तयार करत आहेत अशा आशयाची फिर्याद सदर विष्णु काशिराम तुळसकर व बाळकृष्ण विष्णु तुळसकर यांच्या तर्फे करण्यात आली. परतु, उलटपक्षी त्या दोघांविरुध्द पोलीसांनी कार्यवाही चालु केली व दोघांविरुध्द पोलीसांनी भा.द.वि.कलम ५०४, ५०६ व १८८ अन्वये गुन्हा दाखल केला. वादी याने पोलीसांना हाताशी धरुन सदरचे कृत्य केल्याचे प्रतिवादींचे म्हणणे आहे. सबब प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करुन १०,०००/— रुपये खर्च द्यावा अशी मागणी प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी केलेली आहे.

५. दोन्ही बाजुचे अवलोकन केले असता माझे समक्ष खालील मुद्दे उपस्थित राहातात व त्यावरील मी माझे निष्कर्ष कारणमिमांसेसहीत खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| | <u>मुद्दे</u> | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|---|
| १ | सकृतदर्शनी दावा वादी यांचे लाभात आहे का? | :— होकारार्थी |
| २ | न्यायाचे समतोलत्व मनाई देण्याच्या बाजुने झुकत आहे का? | :— होकारार्थी |
| ३ | मागणीप्रमाणे तुर्तातुर्त ताकीद न दिलेस वादी याचे अपरिमित असे नुकसान होणार आहे का? | :— होकारार्थी |
| ४ | आदेश काय? | :—<u>येणेप्रमाणे</u> |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>मुद्दा क्र. १ ते ३</u>** :—

६. या प्रकरणामध्ये निशाण ५ वरती दिनांक २७/०९/२०१८ रोजी तुर्तातुर्त

ताकिद अर्जावर उभय पक्षकारांचा युक्तीवाद एकून अंतिम आदेश करण्यात आला. त्या आदेशामध्ये वादी याच्या हितामध्ये तुर्तातुर्त ताकिद देण्यात आलेली आहे. सदर आदेश करत असताना न्यायालयाने स्पष्टपणे असे नमुद केलेले आहे की वादी याचा मिळकतीकडे जाण्यासाठी दावा मिळकत परिशिष्ट 'ब' मधुन वाट जाते असे प्रथमदर्शतः वादी प्रस्थापित करत आहे. सबब वादी याच्या मिळकतीकडे जाण्यासाठी आणि त्या मिळकतीचा उपभोग घेण्यासाठी वादी याला परिशिष्ट 'ब' मधील जाणा—या वाटेचा उपयोग करावा लागणार आहे. प्रस्तुत अर्जात नमुद केल्याप्रमाणे प्रतिवादीं विरुध्द एकतर्फा आदेश देण्यात आलेला होता यामध्ये कोणताही वाद नाही. आता सदर आदेश कायम झाल्यामुळे दावा मिळकतीकडे जाणा—या वाटेचा वापर करण्यास प्रतिवादींनी हरकत करु नये असा तुर्तातुर्त ताकिद आदेश झालेला आहे.

७. या कामी वादी तर्फे निशाण ३४ येथे काही छायाचित्र हजर केली आहेत. ती पाहिली असता असे दिसते की वाटेवरती चिरे रचून वाट बंद करण्यात आलेली आहे. या अर्जात त्यांच्या म्हणण्यातील मजकुराचे अवलोकन केले असता सदर वाटेवरती विष्णु काशिराम तुळसकर याने सदर वाट अडविली असे प्रतिवादी क्र. १ ते ५ यांच्या म्हणण्यावरुन स्पष्ट होणारे आहे. अशा परिस्थितीत ज्यावेळेस वादी याच्या हितामध्ये तुर्तातुर्त ताकिद आदेश अस्तित्वात आहे त्याअर्थी सदर वाटेचा वापर करण्यापासून प्रस्तुत दावा चालू असेपर्यंत कोणालाही हरकत करता येणार नाही. सबब वादी याने मागणी केल्याप्रमाणे सदर वाटेवरती जो काही अडथळा झालेला आहे तो दुर होणे गरजेचे आहे.

८. या ठिकाणी आणखी एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की प्रतिवादीचे म्हणण्याप्रमाणे या न्यायालयाचा आदेश विष्णु काशिराम तुळसकर यांच्यावर बंधनकारक नाही असे त्यांचे मत होते. मात्र, सदर परिस्थितीतुन असे दिसते की विष्णु काशिराम तुळसकर याने या दाव्या संदर्भात माहिती झालेली आहे, असे असुन देखील आजपर्यंत या दाव्याचे कामी पक्षकार करुन घ्यावे म्हणुन त्याचे मार्फत कोणताही अर्ज आलेला नाही. त्यामुळे प्रथमदर्शी असे दिसते की विष्णु काशिराम तुळसकर याने दावा मिळकतीतील परिशिष्ट 'ब' मधील सहभागधारक म्हणुन वादीच्या कोणत्याही कृत्यामुळे

जर का खरच हरकत पोहचत असेल तर, त्याने प्रस्तुत दाव्यामध्ये अगर त्याने कोणत्याही प्रक्रिये मार्फत वादी विरुध्द दाद मागायला हवी होती. पोलीस ठाण्यात तक्रार केल्याने त्याने वादी विरुध्द दाद मागीतली असे म्हणता येणार नाही. दिवाणी स्वरुपाचा अधिकार हे दिवाणी न्यायालयातच ठरायला हवेत. अशा एकंदरीत परिस्थितीमध्ये विष्णु काशिराम तुळसकर यांनी जी काही वाट अडविली आहे त्याला प्रतिवादीची फुस आहे किंवा कसे हे आता स्पष्ट होणारे नाही. मात्र सदर वाटेचा वापर करण्याचा अधिकार वादी याला आहे असे प्रथमदर्शत: स्पष्ट झालेले आहे. त्यामुळे अशा परिस्थितीमधुन आज रोजीच्या अवस्थेमध्ये त्या वाटे वरती जे काही चिरे लावलेले आहेत ते खुले करुन मिळणे उचित रहाणार आहे. त्याकरीता अज्ञार्थी ताकिद देणे न्यायोचित ठरणार आहे. सबब सदर आदेश करत असताना पोलीस संरक्षणाची देखील गरज भासु शकते, कारण उभय पक्षकारामध्ये सदर वाटेवरुन वाद वाढलेला आहे. त्यामुळे मी मुद्दा क्र. १ ते ३ चे निष्कर्ष होकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र. ४:—</u>**

९. येणेप्रमाणे मुद्दा क्र. ४ चे निष्कर्ष नोंदविणेकरीता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

१. वादीचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. न्यायालयाचे बेलीफ यांनी दावा मिळकतीमधुन म्हणजे परिशिष्ट 'अ' मधुन परिशिष्ट 'ब' दावा मिळकती मधील जाणा—या वाटेवर ज्याठिकाणी विष्णु काशिराम तुळसकर यांनी चिरे ठेवलेले आहेत ते तेथुन बाजुला सारुन तो अडथळा दुर करावा.

३. वादीने आवश्यक तो बेलीफ भत्ता भरावा.

४. सदर कामकाजाच्या वेळेस वादी यांना वेंगुर्ला पोलीसांमार्फत आवश्यक ते संरक्षण द्यावे, त्यासाठी वादीने परस्पर तसा अर्ज करावा.

सही/—

दिनांक— ०९/१०/२०१८

विनायक द. पाटील
दिवाणी न्यायाधीश क.स्तर. वेंगुर्ला.